मनोरंजनासह प्रबोधनासाठी... दैनिक epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ३०६ वा • बुधवार, ता. १४ मे २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००



## प्रधानमंत्री मोदींनी हवाईदल तळावर सैनिकांची घेतली भेट

**जालंधर । प्रतिनिधी**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काल पंजाब जालंधरमधील आदमपूर हवाई दल तळावर शूर हवाई योद्धे आणि सैनिकांची भेट घेतली आणि त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले, भारत माता की जय ही केवळ एक घोषणा नाही, तर ती प्रत्येक सैनिकाची शपथ आहे, जो आपल्या देशाच्या सन्मान आणि प्रतिष्ठेसाठी आपले जीवन पणाला लावतो.

सशस्त्र दलांच्या अतुलनीय शौर्याला आदरांजली वाहताना ते म्हणाले, ऑपरेशन सिंदूरचा प्रत्येक क्षण हा भारताच्या सशस्त्र दलांच्या ताकदीचा आणि क्षमतेचा पुरावा आहे. आज, तुमच्या ऐतिहासिक कामगिरीमुळे प्रत्येक भारतीयाचे डोके अभिमानाने उंचावले आहे.

जग आता या नवीन आणि दृढनिश्चयी भारताला ओळखत आहे, जो राष्ट्रीय सुरक्षा आणि दहशतवादाबद्दल आपला मजबूत दृष्टिकोन बदलत आहे. दरम्यान दिल्लीतील पाकिस्तानी अधिकाऱ्याला भारताकडून पर्सो ना नॉन ग्रॅटा घोषित, २४ तासांच्या आत देश सोडण्याचे आदेश.



## गुन्हेगारी कायदा अंमलबजावणीच्या प्रगतीचा आढावा घ्यावा- अमित शहा

**पुडुचेरी । प्रतिनिधी**

केंद्रीय गृहमंत्री तथा सहकार मंत्री अमित शहा यांनी नवी दिल्ली येथे उपराज्यपाल के. कैलाशनाथन यांच्यासोबत पुडुचेरीमध्ये तीन नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीचे मूल्यांकन करण्यासाठी ही आढावा बैठक घेतली. (UT). पोलिस, तुरुंग, न्यायालये, खटले आणि न्यायवैद्यक सेवांशी संबंधित प्रमुख तरतुदींच्या प्रगती आणि सद्यस्थितीवर ही चर्चा केंद्रित होती. या बैठकीत पुद्दुचेरीचे गृहमंत्री, केंद्रीय गृह सचिव, मुख्य सचिव आणि केंद्रशासित प्रदेशाचे पोलिस महासंचालक, पोलिस संशोधन आणि विकास ब्युरो (BPR&D) चे महासंचालक, राष्ट्रीय गुन्हे रेकॉर्ड ब्युरो (NCRB) चे संचालक, तसेच गृह मंत्रालय (MHA) आणि पुद्दुचेरी प्रशासनातील इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी शाह यांनी सांगितले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आणलेल्या तीन नवीन गुन्हेगारी कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी केंद्रशासित प्रदेश पुद्दुचेरीने चांगले काम केले आहे. नवीन गुन्हेगारी कायद्यांची लवकर अंमलबजावणी सुनिश्चित करण्यावर गृहमंत्र्यांनी भर दिला. केंद्रीय गृहमंत्र्यांनी सांगितले की, पुद्दुचेरी या केंद्रशासित प्रदेशातील एफआयआर फक्त तमिळ भाषेत नोंदवले जावेत आणि ज्यांना त्याची आवश्यकता आहे त्यांना ते इतर भाषांमध्ये उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करावी. त्यांनी सांगितले की, अटक केलेल्या सर्व गुन्हेगारांचे बोटांचे ठसे NAFIS अंतर्गत नोंदवले जावेत जेणेकरून डेटाबेसचा चांगल्या प्रकारे वापर करता येईल. ते म्हणाले की, कोणत्याही परिस्थितीत कायदेशीर सल्ला देण्याचा अधिकार फक्त अभियोजन संचालकांना (DoP) असावा. गृहमंत्र्यांनी सांगितले की, ई-समन्स, ई-साक्ष्य, न्याय श्रुती आणि फॉरेन्सिक सारख्या तरतुदी शक्य तितक्या लवकर पूर्णपणे अंमलात आणल्या पाहिजेत.

पुढे शाह म्हणाले, केंद्रशासित प्रदेश पुडुचेरीचे मुख्य सचिव आणि पोलिस महासंचालक आठवड्यातून एकदा, गृहमंत्र्यांनी दर १५ दिवसांनी आणि उपराज्यपालांनी महिन्यातून एकदा नवीन गुन्हेगारी कायद्यांच्या अंमलबजावणीच्या प्रगतीचा आढावा घ्यावा.

## कामगारांचा वाटा केवळ गरजेचा नाही तर अनिवार्य- सी.पी. राधाकृष्णन



**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्यावतीने दिले जाणारे कामगार भूषण पुरस्कार व विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते हुतात्मा बाबू गेनू स्टेडियम, कामगार क्रीडा भवन, प्रभादेवी येथे आयोजित कार्यक्रमात प्रदान करण्यात आले. 'विकसित महाराष्ट्र २०४७' च्या दिशेने वाटचाल करीत असताना आणि एक ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्थेचा ध्यास घेतलेला असताना या स्वप्नपूर्तीत कामगारांचा वाटा केवळ गरजेचा नाही तर अनिवार्य आहे, असे प्रतिपादन राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी केले. सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रीडा आणि संघटनात्मक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या कामगारांना पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याची दखल घेणे व त्यांना प्रोत्साहन देणे, हा पुरस्कारमालिकेचा उद्देश असल्याचे प्रतिपादन कामगार मंत्री ॲड.आकाश फुंडकर यांनी यावेळी केले.

## मीना कर्णिक यांच्या आजचे मास्टर्सचे प्रकाशन संपन्न

**पुणे । प्रतिनिधी**

ता. ४ मे रोजी रविवारी ज्येष्ठ सिनेपत्रकार तथा समीक्षक मीना कर्णिक यांच्या उच्च निर्मिती मूल्य असलेल्या आजचे मास्टर्स या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभ संपन्न झाला. यावेळी डॉ. जब्बार पटेल, लेखिका मीना कर्णिक, चित्रपट समीक्षक गणेश मतकरी, गोदावरी



सिनेमाचे दिग्दर्शक निखिल महाजन, साधना साप्ताहिकाचे संपादक विनोद शिरसाठ यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रेक्षक रसिकांच्या ज्ञानात भर पडली, अशी माहिती चित्रपट अभ्यासक तथा निर्माते मितेश ताके यांनी दिली.

## लग्नाच्या दुसऱ्याच दिवशी लष्करी जवान गेला कर्तव्यावर



**नगर तालुका । प्रतिनिधी**

देशसेवेसाठी ३ वर्षापूर्वी भारतीय सैन्यात भरती झालेले, तीन पिढ्यांचा लष्करी वारसा असणारे अहिल्यानगरच्या नारायणडोहो गावचे सुपुत्र मनिष रावसाहेब साठे यांचे १० मे रोजी लग्न झाले.

लग्नासाठी ४५ दिवस सुट्टीवर असताना लग्नानंतर दुसऱ्याच दिवशी त्यांना तात्काळ ड्यूटीसाठी हजर राहण्याचे आदेश देण्यात आले. अंगावरची ओली हळद आणि हातावर रंगलेल्या मेहंदी असूनही काळजावर दगड ठेवून आणि देशसेवा सर्वोच्च मानून आईवडिलांचा एकुलता एक मुलगा



असणारे मनिष हे सुट्टी रद्द करून ११ तारखेला घरून निघून कर्तव्यावर रुजू होण्यासाठी निघाले. त्यांना घरचे आणि सासरच्या दोन्ही मंडळींनी हसत हसत निरोप दिला.

विशेष म्हणजे मनिषचे वडील, सर्व चुलते आणि सर्व चुलत भाऊ देखील सैन्यात होते.

मंगल रावसाहेब साठे (मनिषच्या आई) घरात वडील आणि नवऱ्याचा लष्करी वारसा असल्यामुळे एकुलत्या एक मुलाला लग्नाच्या दिवशीच ड्युटीवर आणि दुसऱ्या दिवशी जावा लागले तरीही हसत हसत निरोप दिला. पाकिस्तान सोबत युद्धजन्य स्थिती असताना मुलगा देशसेवेचे कर्तव्य पार पाडेल याचा एक आई म्हणून खूप अभिमान आहे.

यासर्व प्रसंगी त्याचा मित्रपरिवार देखील मागील ८ दिवसापासून त्याच्यासोबत आणि परिवारासोबत खंबीरपणे उभा आहे. आपला मित्र या सर्व गोष्टींना अतिशय संयमीपणे सामना करतोय त्यामुळे आमचे देखील त्याच्यासोबत आणि त्याच्या परिवारासोबत उभे राहणे काम आहे, अशी त्याच्या मित्रांची प्रतिक्रिया आहे.

## संसदेचे अधिवेशन बोलवा; भारतीय कम्युनिस्ट पक्षाची मागणी



### मोदी यांनी राष्ट्रीय प्रश्नांबद्दल हडेलहप्पी चालविता कामा नये

**मुंबई । प्रतिनिधी**

भारतीय कम्युनिस्ट पक्षाने मागणी केली आहे की, तात्काळ संसदेचे विशेष अधिवेशन बोलवा. याविषयी अधिक माहिती देताना राज्य सचिव ॲड. कॉ. सुभाष लांडे आणि कॉ.राजन क्षीरसागर म्हणाले, भारताची जनता आणि सर्व लोकशाहीवादी शक्ती दहशतवादाविरुद्ध लढ्यात ठामपणे एकत्र उभ्या आहेत. या गंभीर टप्प्यावर, जेव्हा देश पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप लोकांच्या दुःखद मृत्यूवर शोक व्यक्त करतो आहे, तेव्हा ऑपरेशन सिंदूर नंतर पंतप्रधानांनी राष्ट्राला उद्देशून केलेले भाषण राष्ट्रीय हिताच्या मुख्य मुद्यांबद्दल जबाबदारीने उत्तर देण्यात अपयशी ठरले. राष्ट्रीय महत्वाच्या गंभीर प्रश्नांबद्दल हडेलहप्पी करून उत्तर देणे टाळले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे राष्ट्राला उद्देशून भाषण, ''भारत अणुयुद्धाची ब्लॅकमेलिंग सहन करणार नाही आणि कोणत्याही दहशतवादी आव्हानाला तोंड देण्यास तयार आहे'' हे शाब्दिक आश्वासन वगळता, केवळ भाषिक अलंकारांनी शब्दबंबाळ असलेले भाषण होते, या भाषणात परंतु दीर्घकालीन शांतता स्थापित करण्याचा मार्ग मांडण्यास ते अपयशी ठरले. आणि घोषणांमध्ये स्पष्टता नाही तसेच प्रचलित परिस्थितीमागील गुंतागुंतीचे पैलू, विशेषतः आंतरराष्ट्रीय घटकांची भूमिका व उत्तरदायित्वाचे महत्त्व, यांकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. ते पुढे म्हणाले, पंतप्रधानांनी जाणूनबुजून अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांची पडद्यामागील भूमिका या बाबतीत कोणतीही टिप्पणी किंवा उल्लेख केला नाही. त्यामुळे पारदर्शकता न करता पडद्याआड काही बाबी ठेवल्या आहेत. काश्मीरचा मुद्दा हा फक्त भारत आणि पाकिस्तान यांच्यातील द्विपक्षीय मुद्दा आहे ही भारताची अधिकृत भूमिका चालत आली आहे. मात्र अमेरिकेच्या मध्यस्तीने गंभीर प्रश्न उपस्थित होतात. जर आंतरराष्ट्रीय शक्तींच्या सहभागाने किंवा प्रभावाने परकीय राजनैतिक व्यवहार घडत असतील, तर देशातील जनतेला त्याची माहिती असावी. शांतता केवळ संवादातूनच नव्हे, तर सत्य, पारदर्शकता आणि न्यायाच्या आधारेच मिळते. जर सरकारच्या हेतू प्रामाणिक असतील, तर शब्दांना कृतीची साथ द्यावी लागेल. शस्त्रसंधीची सुरुवात आणि त्याबद्दल वाटाघाटींचे तपशील स्पष्ट करणे आणि देशांतर्गत उत्तरदायित्वाचे सुनिश्चित करणे याची पारदर्शकता आवश्यक आहे. ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून सीमापार दहशतवादी पायाभूत रचनेला हानी पोहोचवली गेली, असे सांगण्यात आले. परंतु त्यानंतर पाकिस्तानकडून झालेल्या प्रतिउत्तरामुळे भारतीय भूमीवर नागरी व लष्करी अशा दोन्ही प्रकारचे प्राणहानी झाली. आश्चर्य म्हणजे, पंतप्रधानांनी त्यांच्या भाषणात या मृत्यूंचा उल्लेखही केला नाही. तितकाच चिंताजनक मुद्दा म्हणजे शस्त्रसंधी जाहीर करण्याची पद्धत. जेव्हा देशभरातील शांतताप्रिय नागरिकांनी तणाव कमी करण्याची मागणी केली होती, तेव्हा ही घोषणा भारत वा पाकिस्तानच्या नेतृत्वाने केली नाही, तर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी प्रथम केली आणि मध्यस्थीचे श्रेय स्वतःकडे घेतले. त्यांनी पुढे जाऊन दोन्ही देशांबरोबर व्यापारात मोठी वाढ करण्याची घोषणा केली. हे सर्व घडामोडी भारताच्या सैनिकी स्वायत्ततेबाबत आणि सार्वभौमत्वाला गंभीर ठेच पोहोचविणाऱ्या आहेत व यामुळे गंभीर प्रश्न निर्माण होतात. शिमला करार आणि भारताची तिसऱ्या पक्षाच्या हस्तक्षेपाविरहित द्विपक्षीय संवादाची दीर्घकालीन भूमिका या गोष्टींना या अनपेक्षित घडामोडींमुळे धक्का बसला आहे. या सगळ्या घडामोडींमध्ये अमेरिकेचा नेमका सहभाग काय होता, याबाबत पंतप्रधान मौन का बाळगतात? या तथाकथित मध्यस्थीच्या अटी काय होत्या? प्रस्तावित व्यापारवाढीची चौकट काय आहे आणि त्याचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर आणि परराष्ट्र धोरणावर काय परिणाम होईल? या प्रश्नांना संबोधित न करता पंतप्रधानांनी भाषण पूर्ण करणे, ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. भारतीय कम्युनिस्ट पक्षाने तात्काळ संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची आपली मागणी पुन्हा एकदा व्यक्त केली. राष्ट्रीय सुरक्षेशी, सार्वभौमत्वाशी आणि परराष्ट्र धोरणाशी संबंधित मुद्यांवर चर्चा ही देशाच्या सर्वोच्च लोकशाही मंचावर म्हणजेच संसदेत व्हायलाच हवी, ना की एकतर्फी दूरचित्रवाणी भाषणातून. पंतप्रधान हे संसदेमार्फत जनतेपुढे उत्तरदायी आहेत आणि ती उत्तरदायित्वाची प्रक्रिया टाळली जाऊ शकत नाही, अशी माहिती राज्य सचिव ॲड. कॉ. सुभाष लांडे आणि कॉ.राजन क्षीरसागर यांनी दिली.

## गोरे याची एस.एस.सी. परीक्षेत उत्तुंग कामगिरी

**रायगड । सोपान आडसरे**

खालापूर तालुक्यातील वावरले येथील रयत शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल वावरले येथील विद्यार्थी दीपक ठमाबाई कोंडीराम गोरे, रा. खैराट, पोस्ट - वावरले, तालुका - खालापूर, यांनी मार्च २०२५ मध्ये झालेल्या एस.एस. सी. परीक्षेमध्ये ५०० पैकी ४३१ गुण मिळवून शाळेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्यांच्या गुणांचा टक्का ८६.२०% असून ही संपूर्ण शाळेसाठी गौरवाची बाब आहे. दीपक गोरे यांची ही यशस्वी घौडदौड त्यांची मेहनत, पालकांचे मार्गदर्शन, शिक्षकांचे



परिश्रम आणि शाळेतील शैक्षणिक वातावरण यांचे फलित आहे. त्यांच्या या उत्तुंग यशाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक, शाळा समिती, सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# विजेच्या असुरक्षित तारांना संरक्षक कवच द्यावे- निखिल वारे

## ना. राधाकृष्ण विखे यांना थेट मुंबईत दिले निवेदन

**अहमदनगर । विजय मते**

सावेडी उपनगरातील प्रभाग क्रमांक दोन मधील बहुतांश कॉलनीमध्ये विजेच्या तारा घराजवळून अत्यंत असुरक्षितपणे गेलेले असल्याने ऐन पावसाळ्यात शॉक सर्किटचा धोका अधिक असल्याने जीवितहानी, वित्तहानी, मोठे नुकसान होण्याचा संभाव्य धोका लक्षात घेऊन राधाकृष्ण विखे पाटील यांनी आपल्या अधिकारातून संबंधित विभागास योग्य त्या सूचना देऊन ज्या भागात या असुरक्षित तारा आहेत, त्या ठिकाणी संरक्षण कवच असलेले तारांची तात्काळ व्यवस्था करावी. अशी मागणी नगरसेवक निखिल वारे यांनी पालकमंत्री विखे यांची मुंबई येथे भेट घेऊन निवेदनाद्वारे केली आहे.



या निवेदनात वारे यांनी म्हटले की प्रभाग क्रमांक दोन मध्ये दाट लोकवस्ती असून बहुतांश कॉलनी मधील घरांच्या अगदी जवळून विजेच्या उघड्या तारा अस्ताव्यस्त पद्धतीने गेलेले आहेत तर काही ठिकाणी तारांना ताण नसल्याने डोक्याला लागतील अशा तारांचा झोळ असल्याने त्यामुळेही नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे .

या तारांना संरक्षक कवच बसविणे गरजेचे आहे. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेची हमी मिळेल,अपघातांचे प्रामाणिक कमी होईल. याबाबत स्थानिक नागरिकांनी वेळोवेळी संबंधितांना तक्रारी केल्या असूनही अद्याप योग्य तो ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. तरी पालकमंत्री म्हणून आपण या गंभीर प्रश्नात लक्ष घालावे व संबंधित विभागांना सूचना देऊन संरक्षक कवच असलेल्या तारांची तात्काळ व्यवस्था करावी, असे देखील श्री.वारे यांनी निवेदनात म्हटले आहे. पालकमंत्री विखे यांनी निवेदनाची दखल घेत वारे यांचेशी सविस्तर चर्चा करून या गंभीर समस्याची माहिती घेऊन तातडीने नागरिकांच्या सुरक्षेचा विचार करून तात्काळ संबंधित अभियंता यांना फोन करून संरक्षक कवच असलेल्या नवीन तारांची मागणी करण्याचे निर्देश दिले आहे. ना.विखे यांनी नागरिकांच्या मागणीला त्वरित प्रतिसाद देत हा प्रश्न सोडविला. याबद्दल वारे यांनी समाधान व्यक्त केले



# श्रीराम विद्यालयात ९९-२००० बॅचचे गेट-टुगेदर संपन्न

## २५ वर्षांनी माजी विद्यार्थ्यांची शाळेत पुनर्भेट, आठवणींना दिला उजाळा

**नगरतालुका । प्रतिनिधी**

श्रीराम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पिंपळगाव माळवी येथे ता. ११ मे २०२५ रोजी १९९९-२००० या शैक्षणिक वर्षातील इयत्ता १० वीच्या बॅचचा गेट-टुगेदर मोठ्या उत्साहात व भावनिक वातावरणात पार पडला. तब्बल २५ वर्षांनंतर बालपणीची शाळा, शिक्षक, मित्र-मैत्रिणी आणि आठवणींचा झरा यामुळे संपूर्ण परिसर भारावून गेला होता. कार्यक्रमासाठी सुमारे ३१ आजी-माजी शिक्षकांनी उपस्थिती लावून विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवले. माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करताना आपल्या शालेय जीवनातील गमतीजमती, गोड कटू अनुभव, शिक्षकांचे प्रेम व शिस्तीचे धडे यांना उजाळा दिला. काही विद्यार्थ्यांनी त्या काळातील किस्से, कविता व गीते सादर करत वातावरणात भावनांचा ओलावा निर्माण केला. सूत्रसंचालन भास्कर पोपळघाट व मंगल बनकर यांनी उत्साही पद्धतीने पार पाडले. कार्यक्रमाची सुरुवात आशा कराळे यांच्या सुस्पष्ट प्रस्तावनेने झाली. पाहुण्यांची ओळख विकास वाघ आणि सोमनाथ पुंड यांनी करून दिली. सर्व उपस्थित शिक्षक, मित्र-मैत्रिणी आणि सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार वंदना ढगे यांनी मानले. या भेटीगाठीच्या निमित्ताने जुन्या शालेय आठवणींना नवसंजीवनी मिळाली. अनेकांनी पुन्हा शाळेच्या पटांगणात फिरत बालपणीच्या आठवणी जागवल्या. काही विद्यार्थ्यांनी आपापल्या क्षेत्रातील प्रगतीचे अनुभव शेअर करत एकमेकांना प्रेरणा दिली. शिक्षकांनीही आपल्या विद्यार्थ्यांचा यश पाहून समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी एकत्र भोजनाचा आस्वाद घेत गप्पा रंगवल्या आणि पुन्हा भेटीचे वचन देत एकमेकांचा निरोप घेतला. हा गेट-टुगेदर हा केवळ एक कार्यक्रम नव्हता, तर आठवणींचा, प्रेमाचा आणि शाळेविषयीच्या आपुलकीचा एक अविस्मरणीय सोहळा ठरला.

# काळे व वाघ यांना जाणीव फाऊंडेशनचा गुणवंत कामगार पुरस्कार



**अहमदनगर । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय कामगार दिवस दरवर्षी १ मे रोजी साजरा केला जातो. हा दिवस जगभरातील कामगारांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी, त्यांच्या संघर्षांचे स्मरण करण्यासाठी आणि त्यांचे योगदान मान्य करण्यासाठी साजरा केला जातो. कामाचा सन्मान करा आणि कामगारांचा आदर करा हा या दिवसाचा मुख्य संदेश. कष्टकरी गुणवंत कामगारांचे कौतुक होणे आवश्यक आहे, हे विचारात घेऊन आंतरराष्ट्रीय कामगार दिनाचे औचित्य साधून या वर्षी पासून जाणीव फाऊंडेशनच्या वतीने गुणवंत कामगार पुरस्कार देण्याचे नियोजन केले होते. यासाठी पात्र गुणवंत कामगारांना अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले होते. परीक्षण करण्यासाठी संबंधित क्षेत्रातील ५ प्रतिष्ठितांची कमिटी नेमण्यात आली होती. नगर जिल्ह्यातील विविध औद्योगिक क्षेत्रातून आलेल्या २९ अर्जांमधून २ पात्र कामगारांची विशेष निकषांवर गुणवंत कामगार पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. पुरस्कार वितरण कार्यक्रम नुकताच नगरमध्ये कायनेटिक इंजिनीअरिंग या कंपनीच्या सभागृहामध्ये पार पडला. या कार्यक्रमात गुणवंत कामगार पुरस्कार तुकाराम काळे , कमिन्स कंपनी व किशोर वाघ, कायनेटिक कंपनी यांना प्रमुख पाहुणे मुख्य कार्यकारी अधिकारी राजपाल शर्मा यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. विशेष म्हणजे सोबतच गुणवंत कामगारांच्या गृहलक्ष्मींचाही विशेष गौरव म्हणून त्यांच्यासाठीही मौल्यवान गृहोपयोगी वस्तू भेट देण्यात आल्या. अध्यक्षीय भाषणात राजपाल शर्मा यांनी जाणीव फाऊंडेशन गेल्या १० वर्षांपासून करत असलेल्या उपक्रमाचं तोंड भरून कौतुक केले. आपण सगळे जण स्वतः साठी काम तर करतोच आहोत पण प्रत्येकाने समाजासाठीही काम करणे आवश्यक आहे, असेही ते पुढे म्हणाले. सदर कार्यक्रमाच्या सुरुवातीला पहलगाम येथील आतंकी हल्ल्यात शहीद झालेले पर्यटक तसेच युद्धात शाहिद झालेल्या वीर जवानांना जाणीव फाऊंडेशन व कायनेटिक कंपनीच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली. याप्रसंगी कायनेटिकचे वरिष्ठ मनुष्यबळ महाव्यवस्थापक शशिकांत गुळवे, सुरेश जाधव, सुनील मुंडलीक, जाणीव फाऊंडेशनचे प्रदीप वाखुरे, राहुल जोशी, ॲड विक्रम वाडेकर नोटरी पब्लिक व विश्वस्त जगदंबा देवी ट्रस्ट, मोहटादेवी व ॲड. व इंजिनीयर कैलाश दिघे आदी उपस्थित होते. या कौतुक सोहळ्यासाठी मोठ्या प्रमाणावर कामगार व कर्मचारी उपस्थित होते. या सोहळ्यासाठी कायनेटिक कंपनी कर्मचाऱ्यांचे विशेष सहकार्य लाभले.

# प्रशासकीय सेवेत अधिकारी होताना ग्रामीण भागाशी नाळ जुळलेली असावी- पद्मश्री पवार

**अहमदनगर । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या मातीतून अधिकारी म्हणून घडलेले मुले आपल्या कार्यातून देशा समोर चांगले मॉडेल उभे करत आहेत. प्रशासकीय सेवेत अधिकारी होताना ग्रामीण भागाशी नाळ जुळलेली असली पाहिजे, तेव्हाच ग्रामीण भागाचा सर्वांगीन विकास साधता येणार आहे. स्वावलंबी गावातून राष्ट्रनिर्माण होणार असल्याचे प्रतिपादन पद्मश्री पोपट पवार यांनी केले. यूपीएससी परीक्षेत अहिल्यानगर जिल्ह्यातून विशेष यश मिळवलेले ओंकार खुंटाळे, ज्ञानेश्वर मुखेकर, अभिजित आहेर या गुणवंतांचा युवानच्या वतीने पवार यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. या सन्मान सोहळ्यात अध्यक्षीय भाषणात ते बोलत होते. याप्रसंगी माजी प्राचार्य भास्करराव झावरे, ॲड. श्याम आसवा उपस्थित होते. पुढे पद्मश्री पवार म्हणाले की, हिवरेबाजारचे मॉडेल डोळ्यासमोर ठेवून विविध सरकारी योजना प्रभावीपणे राबवा. यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण होवून समाजाची परीक्षेत सर्वसामान्यांना न्याय देवून उत्तीर्ण होण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचे आवाहन करुन पर्यावरण, गावातील विविध प्रश्नांची जाणीव त्यांनी करुन दिली. सुरवातीस गायक गिरीराज जाधव यांनी गिटारवर प्रेरणा आणि देशभक्तीपर गीत



गाऊन कार्यक्रम एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवला. प्रास्ताविकात युवानचे संस्थापक संदीप कुसळकर यांनी युवानच्या सामाजिक व गरजू घटकांसाठी चालवल्या जाणाऱ्या शैक्षणिक चळवळीची माहिती दिली. प्रा. भास्करराव झावरे म्हणाले की, कोणत्याही क्षेत्रात पुढे जाण्यासाठी वेदना सोसाव्या लागतात, चालत राहिले पाहिजे. प्रयत्नांची पायवाट मोठा रस्ता तयार करत असल्याचे स्पष्ट केले. ॲड. श्याम आसवा यांनी देश चांगला घडविण्यासाठी प्रशासन उत्तम असण्याची गरज विशद केली. युवान विद्यार्थिनी माधुरी ठाणगे, मंगेश गुंजाळ, ज्ञानेश्वर दराडे यांनाही स्पर्धा परीक्षेत मिळवलेल्या यशाबद्दल मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

### युवान तर्फे यूपीएससी गुणवंतांचा गौरव

या कार्यक्रमात गुणवंतांनी आपल्या यशाचा राजमार्ग उपस्थित विद्यार्थी आणि पालकांसमोर उलगडून दाखवला. ओंकार खुंटाळे यांनी युवान ग्रंथालयातून अभ्यासाची सुरवात केल्याचे आणि कधी काळी अशाच प्रेरणा कार्यक्रमात विद्यार्थी म्हणून समोर बसल्याच कृतज्ञतापूर्वक नमूद केले.

व्यक्तिमत्त्व विकासासाठी पदवी काळात विविध उपक्रमात सहभागी झाल्याचे स्वउदाहरणासह सांगितले. ज्ञानेश्वर मुखेकर यांनी वाढती स्पर्धा परीक्षा लक्षात ठेऊन नवोदितांनी प्लॅन बी तयार ठेवण्याचे आवाहन केले. तसेच आर्थिक स्थैर्य दीर्घ तयारीच्या काळात तणाव कमी करण्याचे काम करतो. रँक सोबत तितकीच मोठी जबाबदारी खांद्यावर येत असल्याचे सांगितले. अभिजीत आहेर यांनी हार्डवर्क पेक्षा स्मार्टवर्क अधिक कामी येत असल्याचे सांगितले. इंग्रजी, गणित आदीचा न्यूनगंड न बाळगता आत्मविश्वासाने स्पर्धा परीक्षांना सामोरे गेल्यास यश आपलेच असल्याचे नमूद केले. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांच्या प्रश्नांनाही यशवंतांनी समर्पक उत्तरे दिली. नगरकर गरजू विद्यार्थ्यांसाठी युवान मार्फत आम्ही नेहमीच मार्गदर्शनासाठी उपलब्ध राहू असे आश्वासन त्यांनी विद्यार्थ्यांना दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गीतांजली भावे यांनी केले. आभार युवान विद्यार्थीनी दुर्गा तागड हिने मानले. वंदे मातरमने कार्यक्रमाचा समारोप झाला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुप्रिया मैड, वर्षा कुसळकर, सुरेश मैड आणि युवान विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# १० वी व १२ वी नंतर काय? विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन सत्र; उत्स्फूर्त प्रतिसाद



**अहमदनगर । प्रतिनिधी**

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर पुढील दिशा निवडताना विद्यार्थ्यांसमोर अनेक पर्याय आणि संभ्रम असतो. याच पार्श्वभूमीवर सत्यशोधक बहुजन आघाडी आणि स्टुडंट्स फ ेडरेशन ऑफ इंडिया (SFI) यांच्या संयुक्त विद्यमाने ''१०वी व १२वी नंतर काय?'' या विषयावर मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांसह पालकांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. कार्यक्रमात वैद्यकीय, अभियांत्रिकी, विधी, सिव्हिल सर्व्हिसेस, सोशल सायन्सेस अशा विविध शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रांतील संधींचा सविस्तर आढावा देण्यात आला. या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांनी आपल्या आवडी-क्षमता ओळखून सजग निर्णय घ्यावा, असा आग्रह प्रमुख वक्त्यांनी धरला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. महाराष्ट्र डाके, प्रा. योगेश साठे, विलास साबळे, सुदर्शन चखाले उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संदीप सकट, सुनील ढोले, शाम वैराळ, राहुल ठोकळ, लक्ष्मण शिंदे, जालिंदर शेलार, अजय काते, महेश सकट, सुरेश सकट, रुपेश जगधने कार्यकर्त्यांचे सहकार्य लाभले.तसेच कार्यक्रमाच्या आयोजनात प्रा. महेबुब सय्यद आणि प्रा. बापू चंदनशिव यांचे मोलाचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांनी या सत्रातून घेतलेले मार्गदर्शन उपयोगी असल्याचे सांगत आपल्या विचारांची मांडणी केली. पालकांचाही सहभाग उल्लेखनीय होता. कार्यक्रमाच्या यशानंतर आयोजकांनी असे उपक्रम सातत्याने राबवण्याचा निर्धार व्यक्त केला.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात
छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद
खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

भाड्याने देणे
परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.
- संपर्क -
८८८८३४७४११

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.


मे. रुपाली एजन्सी
फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स
राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.
(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०
ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ**, 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा**, 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक**, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# संजीवनी विद्यापीठात मिळणार इंजिनिअरींगची इंटिग्रेटेड डिप्लोमा व डीग्री

**कोपरगाव । किसन पवार**

संजीवनी विद्यापीठात मागील वर्षापासून बी. टेक.(एआय, एआयएमएल, एआयडीएस, सायबर सिक्युरिटी व कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग), बीबीए, बी. कॉम., एमबीए असे अभ्यासक्रम सुरू करण्यात आले होते. आता संजीवनी विद्यापीठ अंतर्गत स्कूल ऑफ इंजिनिअरींग अँड टेक्नॉलॉजी मध्ये चालु शैक्षणिक वर्षापासून इ. १० वी नंतर कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरींग या अभ्यासक्रमाला प्रवेश दिला जाणार असुन या अभ्यासक्रमाचा कालावधी सहा वर्षांचा असणार आहे. विद्यार्थ्यांना इंजिनिअरींगचा डीप्लोमा आणि डिग्री दोनही मिळणार आहे. विद्यापीठाच्याच प्रवेश परीक्षेतुन प्रवेश निश्चित केला जाणार आहे. तसेच चालु शैक्षणिक वर्षापासून विद्यापीठ अंतर्गत बीसीए, एमसीए, बी.एससी (केमेस्ट्री, मायक्रोबायोलॉजी आणि फुड न्यट्रिशन), एम.एससी (केमेस्ट्री व मायक्रोबायोलॉजी) हे अभ्यासक्रही




सुरू करण्यात येणार आहेत.

या अभ्यासक्रमांना विद्यापीठाच्या अकॅडमिक बोर्ड ऑफ स्टडीजने मान्यता दिली आहे. विद्यार्थी व पालकांना प्रवेशासंदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात आले आहे, अशी माहिती विद्यापीठाने दिली ते पुढे म्हटले आहे की डिग्री इंजिनिअरींगला प्रवेश घ्यायचा असेल तर इ.१२ वी सायन्स करून सीईटी किंवा जेईई या प्रवेश परीक्षा देणे अनिवार्य असते. त्यात चांगला स्कोअर असला तरच दर्जेदार इंजिनिअरींग कॉलेज मध्ये प्रवेश मिळतो. परंतु आता संजीवनी विद्यापीठाने खुल्या केलेल्या पर्यायामुळे हे सर्व अडथळे दुर होणार आहे.

तसेच अनेक विद्यार्थी तीन वर्षांचा इंजिनिअरींगचा डिप्लोमा करून डिग्री इंजिनिअरींगच्या थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश मिळविण्यासाठी प्रयत्न करतात. परंतु थेट दुसऱ्या वर्षाची प्रवेश क्षमता कमी असते. प्रवेशक्षमता मर्यादेमुळे चांगल्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळत नाही. आता संजीवनी विद्यापीठात इ. १० वी नंतर लागलीच बी.टेक डिग्री इंजिनिअरींग करणे सुलभ झाले आहे. इ. १० वी व १२ वीचे निकाल नुकतेच जाहिर झाले असुन विद्यार्थी व पालकांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात आले आहे. शिक्षण पुर्ण झाल्यावर नोकरी मिळालीच पाहीजे या दृष्टीने विद्यापीठाने आयबीएम, फॉर्टिनेट, नॅसकॉम, मायटेक, झोहो, एचसीएल, सॅटकॉम, अशा नामांकित कंपन्यांशी व परदेशी विद्यापीठांशी सामंजस्य करार केले असुन परदेशी विद्यापीठांच्या करारानुसार विद्यार्थ्यांना परदेशात जाण्याची संधीही मिळणार आहे. विविध इंडस्ट्रीजला लागणारे योग्य मनुष्यबळ तयार व्हावे यासाठी कंपन्यांच्या सल्यानुसार अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली असल्याचे पत्रकात नमूद करण्यात आले आहे . सर्व कोर्सेसच्या प्रवेशासाठी नाव नोंदणी करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.



# विधानसभेत हिंदुत्वाचा मुद्दा पुढे करुन ईव्हीएम मशीन हॅक

## छत्रपतींचा अवमान करणाऱ्यांना पकडा- खा. लंके

**श्रीरामपुर । शफीक बागवान**

विधानसभा निवडणुकित जाती-धर्मात वाद निर्माण करण्यासाठी हिंदुत्वाचा मुद्दा जनतेसमोर उभा करून ईव्हीएम हॅक केल्याचा खळबळजनक आरोप खासदार निलेश लंके यांनी केला आहे. राहुरी तालुक्यातील केंदळ येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्या नुतन इमारतीच्या उद्धाटन माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्या हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी खासदार लंके बोलत होते.

खासदार लंके म्हणाले की, भाजप वाल्यांनी आम्हाला हिंदुत्व शिकवू नये. राहुरी शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान करणाऱ्या आरोपींना अद्यापही हे अटक करू शकले नाहीत, त्यामुळे आता आम्ही लवकरच रस्त्यावर उतरून लढा उभारू, असा इशारा यावेळी लंके यांनी दिला. यावेळी माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी नूतन ग्रामपंचायतइमारतीतजाणाऱ्यासर्वसदस्यमंडळाचे स्वागत केले, व या इमारतीतून गोरगरिबांची कामे मार्गी लावावेत, असे आवाहन केले. व्यासपीठावर उपसभापती बाळासाहेब खुळे, रविंद्र आढाव, प्रकाश देठे, वैभव जरे, अरुण डोंगरे, त्रिंबक तारडे, गोरक्षनाथ तारडे, विजय चव्हाण, मधुकर तारडे, उषाताई मांगुर्डे, बांधकाम विभागाचे विजय झावरे ,तलाठी लोखंडे, सरपंच गोविंद जाधव, उपसरपंच विजय चव्हाण, विष्णू तारडे, अविनाश हरिचंद्रे, आण्णासाहेब देवरे ,सदाशीव तारडे, ज्ञानदेव हापसे, भिमराज चव्हाण बाळासाहेब चव्हाण, ग्रामसेवक भिसे, सुभाष तारडे, मनोज तारडे, ज्ञानदेव कैतके, शिवाजी तारडे, अनिल तारडे, कानिफनाथ तारडे, शैला तारडे, मालन बोर्डे, आरती फुलारे, प्रमोद तारडे, नामदेव तारडे, औदुंबर तारडे, लक्ष्मण तारडे, उज्वाला हरिश्चंद्रे, विशाल तारडे आदिंसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# श्री छत्रपती शिवाजी विद्यालयाचा इयत्ता दहावी निकाल ९५.२८%

## अथर्व खाडे ९५.८०% टक्के मिळवत प्रथम

**जामखेड । रिजवान शेख**


महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे इयत्ता १० वी बोर्ड परीक्षा २०२५ चा निकाल जाहीर करण्यात आला. दहावीचा निकाल ऑनलाईन जाहीर झाला. रयत शिक्षण संस्थेच्या जामखेड तालुक्यातील जवळा येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयाचा इयत्ता दहावी २०२५ चा निकाल ९५.२८% लागला.

त्यामध्ये खाडे अथर्व बापू याने ९५.८०% टक्के मिळवत प्रथम येण्याचा मान मिळवला. तसेच जानवी संजय कथले हिने ९५.४०% टक्के मिळवून द्वितीय क्रमांक मिळवला तर सुफियान जाकीर शेख ९४% टक्के मिळवून तृतीय क्रमांक मिळविले आहे. तसेच कु.वाळूंजकर वैष्णवी महेंद्र ९३.८०, कु.हजारे क्रांती ईश्वर ९३.६०, रणवीर पोपळे ९३.२०, कु.वाघमारे श्रावणी रविंद्र ९३ टक्के मिळवत यश संपादन केले. विद्यालयातील १०६ विद्यार्थ्यांपैकी १०१ विद्यार्थ्यांना यश मिळाले. त्यामध्ये ३७ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले तर प्रथम श्रेणीमध्ये ४४ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. आणि द्वितीय श्रेणी मध्ये १७ विद्यार्थ्यांचा समावेश आहे तर ३ विद्यार्थी उत्तीर्ण श्रेणीत आहेत. या मिळालेल्या यशाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक बाळासाहेब जोरे, पर्यवेक्षक तुळशीराम भोजने तसेच विद्यालयाचे सर्व शिक्षक, कर्मचारी यांनी शुभेच्छा देत अभिनंदन केले तसेच सर्व गावकरी, पालक सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे विविध स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# हिवरेबाजारमधे पर्यावरण मित्र युवा प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

**नगर तालुका । प्रतिनिधी**

आदर्शगाव हिवरेबाजारमध्ये दोन दिवसीय राज्यस्तरावरील युवा प्रशिक्षण पर्यावरण मित्र कार्यशाळा ता.१२ व १३ मे रोजी घेण्यात आली. कार्यशाळेस लोकल ते ग्लोबल, स्वच्छ आणि निरोगी वातावरणाच्या अधिकारासाठी युवा-नेतृत्व विकास करणे, युवा नेतृत्व बळकट करणे त्यांची क्षमता वाढवणे आदी विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी हिवरेबाजारची यशोगाथा पदमश्री डॉ. पोपट पवार यांनी सांगितली.तसेच जागतिक तापमान वाढ, जलसंधारण, कचरा व्यवस्थापन, ऊर्जा बचत आणि जैवविविधता संरक्षण तसेच



वृक्षारोपण आदी विषयांवर शिबिरार्थींना मार्गदर्शन केले.

बाल हक्कावर मुक्त गप्पा झाल्या. कार्यशाळेस अहिल्यानगर, पुणे, परभणी, संभाजीनगर, बीड येथील सत्तर शिबिरार्थिंनी सहभाग घेतला होता. यावेळी स्वप्नील मानव, चंदन देसाई, मंगेश सर यांनीही शिबिरार्थींना मार्गदर्शन केले.

# जवाहर विद्यालय एसएससीचा ८७.३७ टक्के निकाल

**नेवासा । रावसाहेब राशिनकर**





तालुक्यातील चांदा येथील अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा ८७.३७ टक्के निकाल लागला. फेब्रुवारी/मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या एस.एस.सी. बोर्ड परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून शासन नियमाप्रमाणे कॉपी मुक्त वातावरणात परीक्षा घेण्यात आल्या होत्या. प्रणव सचिन महाजन या विद्यार्थ्याने ९४.००% गुण मिळवून प्रथम क्रमांक, धुमाळ सायली गणेश ९३.६०% गुण मिळवून द्वितीय क्रमांक तर धुमाळ स्वरूपा प्रकाश हिने ९२.८०% गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना कारले. पी.एम., शेंडगे एस.आर., राजगुरू व्हि.व्हि., घोडे बी.एस., ढेरे एस.ए., भोजने आर.एन., शेंडगे आर.बी., शेटे जे.एस., लोखंडे एम.एम., नेहुलकर, कासार एस.एस., म्हसे एन.के., वैरागर ए.के. यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. यशाबद्दल अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रा.ह. दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव जयंत वाघ, खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे, मुकेश मुळे तसेच संस्थेचे सर्व विश्वस्त व सदस्य, संस्था कार्यकारिणी सदस्य डॉ. दीपक शिंदे व नानासाहेब अंबाडे, विद्यालयाचे प्राचार्य हरीभाऊ जावळे, उपप्राचार्य रघुनाथ भोजने, पर्यवेक्षक अविनाश रामफळे, समन्वयक प्रा. भाऊसाहेब तांबे, प्रसिध्दी विभाग प्रमुख प्रा. रावसाहेब राशिनकर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष कैलास दहातोंडे, उपाध्यक्ष बाबासाहेब जावळे आदींसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवृंद यांनी अभिनंदन केले.

# श्रीरामपूरवासियांना रोज मिळणार पाणी ; नागरिकांकडून पालिकेला धन्यवाद

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

सद्यस्थितीत श्रीरामपूर नगरपालिकेकडून पाणीपुरवठ्यात कोणतीही कपात करण्यात आली नसून पूर्वीप्रमाणेच फक्त शनिवार सोडून दररोज पाणीपुरवठा केला जाणार आहे. श्रीरामपूर नगरपालिकेच्या वतीने नवीन पाणी साठवण तलावाचे काम सुरू असून त्यातील एका तलावाचा भराव अचानक वाहून गेल्याने पाण्याचे नुकसान झाले आहे. भराव अचानक तुटल्याने तलावातील पाणी वाहून गेले या पार्श्वभूमीवर शहरातील नागरिकांच्या मनात वेगवेगळ्या शंका निर्माण झाल्या. या पार्श्वभूमीवर श्रीरामपूर आरोग्य सेवा या ग्रुपवर नागरिकांनी पाणीपुरवठा संदर्भात वेगवेगळया टिप्पण्या केल्या असता पाणीपुरवठा विभागाचे तंत्रज्ञान निलेश बकाल यांनी पाणीपुरवठयात सद्यस्थितीत कपात नसल्याचे जाहीर केले आहे. श्रीरामपूर नगरपालिका जोपर्यंत अधिकृतपणे या संदर्भात जाहीर करत नाही तोपर्यंत शनिवार सोडून विजेच्या उपलब्धतेनुसार शहरवासीयांना गोड आणि स्वच्छ तसेच निर्जंतूक पाणी पुरवठा करण्याचे आश्वासन निलेश पाटील बकाल यांनी दिले आहे. दरम्यान भराव वाहून गेल्यानंतर शहरातील नागरिकांना पाणी टंचाईला मोठे सामोरे जावे लागेल, अशा प्रकारची वार्ता पसरवण्यात आली यामुळे श्रीरामपूर शहरवासीय नागरिक भयभीत झाले होते. शहरातील नागरिक या संदर्भात आपापल्या शंका उपस्थित करत असताना पाणीपुरवठा विभागाचे तंत्रज्ञान निलेश बकाल यांनी शनिवार सोडून आणि श्रीरामपूर नगरपालिका जोपर्यंत अधिकृतपणे जाहीर करत नाही तोपर्यंत हा पाणीपुरवठा करण्यात येणार असल्याचे सांगितले आहे. यामुळे शहरवासीयांचा सध्यातरी जीव भांड्यात पडला आहे. त्यांच्या मनातील भीती यामुळे दूर झाली आहे. शहरातील हजारो नागरिकांनी या संदर्भात पालिकेला धन्यवाद दिले आहेत.





# प्राईड अकॅडेमीची गौरी कवडे अशोकनगर केंद्रात प्रथम

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

माऊली प्रतिष्ठान चॅरिटेबल ट्रस्ट संचलित प्राईड अकॅडेमी इंग्लिश मेडीअम स्कूल व ज्युनिअर कॉलेज, भेर्डापूर-वांगी महाविद्यालयाचा शैक्षणिक वर्ष २०२४-२५ चा इयत्ता १० वी चा निकाल १०० टक्के लागला असून शाळेची विद्यार्थीनी कु. गौरी गणेश कवडे हिने ९४.८० टक्के गुण मिळवून केंद्रात प्रथम आली आहे.

शाळेची १० वी बोर्ड परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची ही पहिली बॅच होती. कवडे अनुष्का संदीप हिने ९३.२० टक्के गुण मिळवत द्वितीय तर गायकवाड प्रेरणा उमेश हिने ९२ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला. माऊली प्रतिष्ठानचे संस्थापक माऊली मुरकुटे व प्राईड अकॅडेमीच्या संस्थापिका तथा पंचायत समिती मा. सभापती डॉ. वंदनाताई मुरकुटे यांनी यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या. शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक पालक समिती, शाळेच्या प्राचार्या, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच ग्रामस्थ यांनी विद्यार्थांच्या प्रगतीचे कौतुक केले व पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

# एकनाथ माध्यमिक विद्यालय उज्ज्वल निकालाची परंपरा यंदाही कायम

**शेवगाव । शिवाजी घुगे**

तालुक्यातील एकनाथ माध्यमिक विद्यालय, एरंडगाव या नामवंत शिक्षण संस्थेने आपल्या यशाची परंपरा यंदाही कायम राखली आहे. मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या एस.एस.सी. (इ. १०वी) परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून विद्यालयाचा एकूण निकाल ७९.१६ टक्के लागला आहे. यंदाच्या 'इन कॅमेरा' पद्धतीने पार पडलेल्या परीक्षेत विद्यार्थ्यांची खरी परीक्षा झाली असतानाही विद्यालयाने उल्लेखनीय गुणवत्तेची कामगिरी केली आहे.

विद्यालयातून परीक्षेसाठी एकूण ४८ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. यामध्ये ४ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य, १४ विद्यार्थ्यांनीप्रथमश्रेणी, तर१० विद्यार्थ्यांनी




द्वितीय श्रेणीत यश संपादन केले आहे. विद्यालयातुन प्रथम क्रमांक: श्रद्धा मच्छिन्द्र भागवत ९० टक्के, द्वितीय क्रमांक: शेख शबनम चाँद ८६.२० टक्के, तृतीय क्रमांक: क्षीरसागर प्रणाली हनुमान ८१.८० टक्के मिळविले आहे.

या यशामागे मुख्याध्यापक बाळासाहेब घोरपडे यांचे कुशल नेतृत्व आणि सर्व शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले आहे. वर्षभर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रशिक्षण आणि मार्गदर्शन नियमितपणे करण्यात आले. विद्यालयाच्या या यशस्वी निकालाबद्दल शिक्षक दिलीपकुमार रणशिंग, कैलास नजन, प्रकाश दहिफळे, नवनाथ कदम, किशोर पवार, देवेंद्र बोडखे, अर्जुन घुगे, विद्या भागवत, आशा फड, सुबोध बरकले, किशोर गोर्डे, काकासाहेब पाटेकर, समद शेख, संजय मगर, धोंडीराम काळे, दत्तात्रय गुजर तसेच इतर शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले. या गौरवशाली क्षणी संस्थेच्या अध्यक्षा मोरे, सचिव बबन पवार, सरपंच संतोष धस (एरंडगाव समसूद), सरपंच गोकुळ भागवत (एरंडगाव भागवत), सरपंच सुरेश गजभिव (लाखेफळ) तसेच सर्व ग्रामस्थ एरंडगाव यांनी सर्व विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे आणि विद्यालयाचे मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# एका युगाचा अंत

क्रिकेटचा किंग, चेस मास्टर, विक्रमवीर, रन मशिन यासारखी अनेक बिरुदावली ज्याच्या नावापुढे लागली आहेत तो भारताचाच नव्हे तर जगातील सर्वोत्तम फलंदाज, भारताचा कोहिनूर विराट कोहलीने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती स्वीकारीत असल्याची घोषणा सोमवारी केली आणि संपूर्ण क्रिकेट विश्व हळहळले. मागील आठवड्यात रोहित शर्मा या भारताच्या माजी कर्णधारानेही कसोटीतून निवृत्ती स्वीकारली होती तेंव्हा पासून विराटच्या निवृत्तीची चर्चा होऊ लागली होती मात्र आगामी इंग्लंड दौऱ्यात विराट खोऱ्याने धावा काढेल आणि मगच कसोटीतून निवृत्त होईल अशी अपेक्षा क्रिकेट चाहत्यांना होती मागील दोन वर्षात विराट कोहली कसोटीत अपेक्षित कामगिरी करू शकला नसला तरी आगमी इंग्लंड दौऱ्यात तो चांगली कामगिरी करून संघाला विजय मिळवून देईल अशी अपेक्षा असतानाच त्याने कसोटीतून निवृत्तीची घोषणा केल्याने क्रिकेट चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. रोहित शर्मा पाठोपाठ विराट कोहलीनेही कसोटी क्रिकेटला रामराम केल्याने भारतीय संघाला त्याचा मोठा फटका बसणार आहे. कारण रोहित आणि विराट या दोघांनी मिळून मागील चौदा वर्षात भारताला अनेक अविस्मरणीय विजय मिळवून दिले आहेत. भारतीय क्रिकेटचे जय विरू असलेल्या या दोन ज्येष्ठ खेळाडूंच्या निवृत्तीचे कसोटी क्रिकेटमधील रोको युग संपले असे म्हणावे लागेल.



निवृत्त कधी होणार आहात? , असे विचारण्याआधीच निवृत्ती घेणे योग्य असते असे उदगार दिग्गज कसोटीपटू विजय मर्चंट यांनी निवृत्तीच्या अनुषंगाने काढले होते. कधी जाणार ? असे क्रिकेट चाहत्यांनी विचारण्यापेक्षा का गेलास ? असे विचारणे केंव्हाही चांगले असा विचार करूनच कदाचित या दोघांनी निवृत्ती स्वीकारली असेल. काहीही असो मात्र या दोघांच्या निवृत्तीचे कसोटीतील एका युगाचा अंत झाला असेच म्हणावे लागेल. क्रिकेट या खेळाने जगाला अनेक महान खेळाडू दिले. सचिन तेंडुलकर हा त्यापैकीच एक महान खेळाडू. क्रिकेटमधील दैदिप्यमान कामगिरीने तो क्रिकेटचा देव बनला. जवळपास दोन तप त्याने क्रिकेटवर अधिराज्य गाजवले. भारताला अनेक अविश्वसनीय विजय त्याने मिळवून दिले. २०१३ साली त्याने निवृत्ती स्वीकारली. निवृत्ती स्वीकारण्यापूर्वी त्याने विक्रमांचे एव्हरेस्ट गाठले. तो निवृत्त झाल्यावर त्याच्या इतक्या क्षमतेचा खेळाडू पुन्हा भारताला मिळेल का ? असाच प्रश्न संपूर्ण क्रिकेट विश्वाला पडला होता. ज्या प्रश्नाचे उत्तर कोणाकडेच नव्हते त्या प्रश्नाचे उत्तर खुद्द सचिनकडे होते. सचिनला जेंव्हा प्रश्न विचारण्यात आला की तुझा विश्वविक्रम कोणता खेळाडू मोडेल असे तुला वाटते तेंव्हा त्याने क्षणाचाही विलंब न करता उत्तर दिले विराट कोहली सर्वांना त्यावेळी ही अतिशोक्ती वाटली पण सचिनने विराटची गुणवत्ता हेरली होती. निवृत्त होण्यापूर्वी चार पाच वर्ष तो आणि विराट एकत्र खेळले होते त्यामुळे विराट कोणत्या क्षमतेचा खेळाडू आहे आणि तो काय करू शकतो हे सचिनला माहीत होते त्यामुळेच सचिनने आपला वारसदार म्हणून विराटची निवड केली होती. विराटने सचिनचे म्हणणे अवघ्या दहा वर्षात खरे करून दाखवले आणि सचिनचा विश्वास सार्थ ठरविला. आज विराटने देखील सचिन प्रमाणे विक्रमांचे इमले चढले आहेत इतकेच नाही तर सचिनचे अनेक विक्रम त्याच्या दृष्टिक्षेपात होते. सचिनच्या १०० शतकांचा विक्रम विराट लवकरच आपल्या नावे करेल असेच सर्वांना वाटत होते त्याच्या नावे ८२ शतके आहेत. कसोटीत त्याने ३० शतके झळकावली आहेत त्यामुळेच त्याच्याकडून ही अपेक्षा व्यक्त केली जात होती आज तो ३७ वर्षाचा होत आहे. त्याचा फिटनेस जबरदस्त आहे. वीस वर्षाचा खेळाडू देखील त्याच्यासमोर फिका पडेल असा त्याचा फिटनेस आहे त्यामुळे तो आणखी दोन तीन वर्ष सहज खेळू शकला असता. त्यामुळे त्याने हा विक्रम सहज मोडला असता मात्र त्याने विक्रमांचा विचार केला नाही. सचिन नंतर सर्वाधिक शतके विराटच्याच नावावर आहेत. विराट केवळ विक्रमवीर बनला नाही तर तो आज जगातला महान फलंदाज बनला आहे. उत्तम खेळाडू ते महान खेळाडू बनण्यापर्यंतचा त्याचा प्रवास अचंबित करणारा आहे. अवघ्या दहा वर्षात तो आज जगातला महान खेळाडू बनला आहे. त्याने धावांची टांकसाळ उभारली आहे. प्रत्येक सामन्यात तो खोऱ्याने धावा काढत आहे. त्याची बॅट म्हणजे जणू धावांची मशिन, त्याच्या बॅट मधून धावांची बरसात होत आहे म्हणूनच आकाश चोप्रा त्याला विराट द रन मशिन कोहली असे म्हणतो. त्याने काढलेल्या शतकांपैकी ९५ टक्के शतके भारताच्या विजयास कारणीभूत ठरली आहेत यावरून त्याच्या शतकांचे मोल लक्षात येते. धावांचा पाठलाग करताना तर त्याने सर्वाधिक शतके झळकावली आहेत म्हणूनच त्याला चेस मास्टर असेही म्हंटले जाते. विराटने शतक झळकावले म्हणजे भारत विजयी झाला असेच समीकरण बनले आहे. केवळ शतकच नव्हे तर त्याच्या अनेक छोट्या मोठ्या खेळी भारताला विजय मिळवून देणाऱ्या ठरल्या. भारताला अनेक अविश्वसनीय विजय त्याने मिळवून दिले आहेत. ऑस्ट्रेलियामध्ये झालेल्या टी २० विश्वचषक स्पर्धेतील पाकिस्तान विरुद्धचा सामना आठवा. आपण तो सामना केवळ विराटमुळे जिंकू शकलो. हातातून गेलेला सामना त्याने ज्याप्रकारे खेचून आणला ते पाहून प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फिटले. तशी खेळी फक्त आणि फक्त विराटच खेळू शकतो ती खेळी म्हणजे फक्त एक उदाहरण आहे. तशा प्रकारच्या अनेक खेळी करून त्याने भारताला अनेक अशक्यप्राय विजय मिळवून दिले आहेत. कठीण समय येता विराट कामी येई.... असे उगीच क्रिकेटप्रेमी म्हणत नाहीत. भारतीय कसोटी क्रिकेटचा तर खारखरा राजदूत होता. कसोटीत त्याने ३० शतके आणि ३१ अर्धशतके झळकावली आहेत. इतकेच नाही तर कसोटीत त्याने तब्बल ७ द्विशतके झळकावली आहेत. कसोटीत त्याने एकूण ९,२३० धावा काढल्या आहेत त्यात २५४ ही त्याची सर्वोच्च धावसंख्या आहे. इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, न्युझीलंड, दक्षिण आफ्रिका, वेस्ट इंडिज, श्रीलंका, बांगलादेश अशा सर्वच देशात त्याने शतके झळकावली आहेत. केवळ फलंदाज म्हणूनच नाही तर कर्णधार म्हणूनही त्याने देशासाठी सर्वोत्तम कामगिरी केली आहे. भारताचा कसोटीतील सर्वात यशस्वी कर्णधार म्हणून विराटचीच नोंद होते. त्याच्या नेतृत्वाखाली भारताने तब्बल ४० कसोटी सामने जिंकले आहेत. कर्णधार म्हणून त्याने ६८ कसोटीत भारताचे नेतृत्व केले. ६८ कसोटीत ४० विजय मिळवणारा विराट कोहली हा कसोटीतील भारताचा सर्वोत्तम कर्णधार ठरला आहे. त्याच्या नंतर महेंद्रसिंह धोनीचा नंबर लागतो त्याने भारताला २७ कसोटीत विजय मिळवून दिले आहेत. विराटच्या नेतृत्वाखाली भारताने सलग ९ कसोटी मालिका जिंकल्या आहेत. अशी कामगिरी फक्त ऑस्ट्रेलियाच्या रिकी पाँटिंगलाच करता आली आहे. आजच्या टी २० च्या युगात त्याने कसोटी क्रिकेटला नेहमीच प्राधान्य दिले आहे. कसोटी क्रिकेट हेच खरे क्रिकेट असे तो नेहमी म्हणायचा म्हणूनच कसोटीत भारताला विजय मिळावा यासाठी तो सर्वस्व पणाला लावायचा. कसोटी सामना जिंकण्यासाठी जी जिगर लागते जो संयम लागतो तो ग्याच्यकडे होता म्हणूनच तो कसोटी क्रिकेटचा खराखुरा राजदूत होता. त्याची ती जिगर, तो संयम आता पुन्हा दिसणार नाही. पांढऱ्या जर्सी मध्ये तो पुन्हा मैदानात उतरणार नाही याची रुखरुख क्रिकेट चाहत्यांना कायम राहणार आहे असे असले तरी त्याने गेल्या १४ वर्षात भारतीय कसोटी क्रिकेटची जी सेवा केली आहे ती क्रिकेट चाहते कधीही विसरू शकणार नाही.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद

# दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे दै. रयत समाचारकडून हार्दिक अभिनंदन

| | | | | |
|---|---|---|---|---|
|  |  |  |  |  |
| सिध्देश सिमा रविंद्र फुलसौंदर<br>भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल, अहमदनगर | अवंतिका पुजा राहुल जाधव<br>डिपॉल इंग्लिश मिडियम स्कूल, राहुरी | शिवानंद सुकेशणी विष्णु उदे<br>भिंगार हायस्कूल, भिंगार | स्नेहल निर्मला संदीप म्हस्के<br>श्री समर्थ विद्या मंदिर, अहमदनगर | तन्मय स्मिता प्रितम देवळालीकर<br>सिक्रेट हार्ट कॉन्व्हेंट स्कूल, अहमदनगर |
|  |  |  |  |  |
| गार्गी निर्मला संतोष खोडदे<br>नेताजी सुभाषचंद्र भोस माध्यमिक विद्यालय, पानोली | प्रतिक रेणुका संतोष शिरसाठ<br>भैरवनाथ विद्यालय, आगडगाव | संचित अनुराधा संदीप कोतकर<br>ज्ञानसंपदा इंग्लिश मिडियम स्कुल, सावेडी | अजिंक्य रेणुका मिनीनाथ आडसरे<br>कुडाळ हायस्कूल, ता. कुडाळ, सिंधुदुर्ग | महेश जनाबाई मारुती कोतकर<br>माध्यमिक विद्यालय इसळक, निंबळक |
|  |  |  |  |  |
| अक्षरा अनुराधा अशोक निंबाळकर<br>ऑक्झिलिअम कॉन्व्हेंट हायस्कूल, सावेडी | राजनंदिनी मनिषा ज्ञानेश्वर काळे<br>ज्ञानसंपदा इंग्लिश मिडियम स्कुल, सावेडी | याह्या रहिला मुदस्सर सय्यद<br>पी.ए.इनामदार इंग्लिश मिडीयम स्कूल, अहमदनगर | ओम स्वाती गणेश कुऱ्हे<br>सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालय, म.फुले.कृषी विद्यापीठ, राहुरी | साक्षी सोनाली भरत खाकाळ<br>केंद्रीय विद्यालय नंबर १, अहमदनगर |

# १८ मे रोजी भव्य कुंडीलिनी शक्ती जागृती कार्यक्रम



**अहमदनगर । प्रतिनिधी**

प.पू.आदिशक्ती श्री माताजी श्री निर्मला देवी यांच्या परम कृपेने सहजयोग ध्यान साधनेचा आत्मसाक्षात्काराचा कार्यक्रम वार रविवारी दिनांक १८ मे २०२५ रोजी सायंकाळी ०६:३० वा. भव्य दिव्य असा चैतन्यमयी सोहळा अहिल्यानगर उपनगर सावेडी भागात होणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य प्रचार प्रसार समितीने दिली आहे. परम पूज्य श्री माताजी यांचे आजोळ हा अहिल्यानगर जिल्हा पूर्वी या जिल्ह्याचे नाव अहमदनगर होते याच ठिकाणी बऱ्याच वेळा श्री माताजी यांनी नवीन साधकांसाठी पब्लिक प्रोग्राम घेतले. अहिल्यानगर शहरातील सावेडी उपनगर हा भाग याच ठिकाणी १९८७ मध्ये आदिशक्ती श्री माताजी यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी याच भूमीमध्ये स्वतः श्री माताजी साकार रुपात असताना याच मैदानावरती नवीन साधकांसाठी पब्लिक प्रोग्राम घेतला पुन्हा आता हा योग बऱ्याच वर्षांनी आलेला आहे. या कार्यक्रमाचा प्रचार प्रसाराची सुरुवात दिनांक १५/०५/२०२५ ते दिनांक १८/०५/२०२५ पर्यंत या सावेडी उपनगरात सहजयोगी बंधू भगिनी प्रचार प्रसार करून १८ तारखेच्या कार्यक्रमाची पत्रिका वाटणार आहेत. या साठी अहिल्या नगर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातून सहजयोगी येणार आहेत. शनिवार संध्याकाळी ७.०० वा. सहज भुवन आश्रम, गोविंदपुरा, अहिल्या नगर येथे अमरावती येथील सहजयोगी दलाल बंधू श्री संदीप दलाल व श्री मिलिंद दलाल यांचा भजन संध्याचा कार्यक्रम होणार असून १८ मे रोजी सकाळी ११ वा. सहजयोग्यांसाठी सेमिनार होईल व दुपारी ०४=०० वा. प. पु. माताजी श्री निर्मला देवी यांची भव्य मेगा रॅली खंडेलवाल भुवन, जॉगिंग ट्रॅक जवळ येथून निघून सपकाळ चौक, यशोदा नगर मार्गे पाईप लाईन रोड, भिस्तबाग चौक कुष्टधाम रोड, प्रोफेसर चौक मार्गे जॉगिंग ट्रॅक मैदान येथे येईल व सायंकाळी ६.३० वा अहिल्या नगर मधील साधकांसाठी भव्य पब्लिक प्रोग्राम कुंडलिनी शक्ती जागृती चा कार्यक्रम होणार आहे.

# बहुचर्चित निंबळक रेल्वे उड्डाणपुलाचे स्वप्न प्रत्यक्षात साकारणार

**नगर तालुका । दिपक शिरसाठ**

तालुक्यातील निंबळक येथील रेल्वेगेटवर प्रस्तावित असलेला बहुचर्चित उड्डाणपुल अखेर प्रत्यक्षात साकारण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचलण्यात आले. आज ता. १३ मे रोजीपासून या पुलाच्या अंतिम सर्वेक्षणास सुरुवात झाली असून, लवकरच प्रत्यक्ष कामास प्रारंभ होणार असल्याची माहिती समोर आली आहे. सन २०१७ पासून या पुलासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे पंचायत समितीचे माजी उपसभापती डॉ. दिलीप पवार यांनी बी. डी. कोतकर, दत्तात्रय दिवटे, दत्तूअण्णा कोतकर, शिवाजी दिवटे, दत्ता कोतकर, दत्ता गुलाब कोतकर, संदीप कोतकर, विकास घोलप, निलेश पाडळे आणि अन्य ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामस्थ यांच्या सहकार्याने हा प्रश्न उचलून धरला होता. विविध माध्यमांतून रेल्वे अधिकाऱ्यांकडे सातत्याने पाठपुरावा करून हा प्रस्ताव रेल्वे मंत्रालयाकडे पोहोचवण्यात आला होता. या पाठपुराव्याला यश मिळत जानेवारी २०२५ मध्ये रेल्वे मंत्रालयाकडून शंभर टक्के निधीची तरतूद करणारे पत्र प्राप्त झाले. राज्य शासनाच्या अडथळ्यांमुळे प्रलंबित असलेली निम्म्या निधीची अडचणही दूर झाली. आज करण्यात आलेल्या अंतिम सर्व्हेमध्ये ठेकेदार कंपनीचे अधिकारी आणि रेल्वे अधिकारी उपस्थित होते. जागेचे मोजमाप घेऊन खुणा करण्यात आल्या असून, लवकरच ड्रोन सर्वेक्षणाद्वारे अंतिम रेखांकन तयार होईल आणि त्यानंतर प्रत्यक्ष डिझाइन व बांधकामाची प्रक्रिया सुरू होईल. या रेल्वेगेटमुळे अनेक वर्षांपासून नागरिकांना वाहतूक कोंडी, रुग्णवाहिकांच्या अडचणी, शालेय व कामगार प्रवाशांच्या विलंबाचा त्रास सहन करावा लागत होता. निंबळक गावासोबतच एमआयडीसी मधील हजारो कामगार, नगर शहर, नगर व पारनेर तालुक्यातील अनेक गावांचे नागरिक या पुलाच्या प्रतिक्षेत होते. या उड्डाणपुलाच्या निर्मितीमुळे निंबळकसह परिसरातील विकासाला गती मिळणार आहे आणि वर्षाअखेरीस कामाला सुरुवात होईल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.




**सर्वांच्या सहकार्याने जनतेचे स्वप्न साकार होत असताना मनस्वी आनंद होत आहे. आता उद्योग, व्यवसाय व आर्थिक उलाढाल निश्चितच वाढेल.**

**डॉ. दिलीप पवार**
माजी उपसभापती,
पं.स. नगर